# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५४ - २३** **दिनांक : - १३/१०/२०२३**

## लाखोंचा एम.डी. (MD) अंमली पदार्थ बाळगणा-या नायेझेरीयन नागरीकास पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांना यश

दिनांक ०५/१०/२०२३ रोजी १५.३० वाजता गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कक्षाचे शाहुराज रणवरे, पोलीस निरीक्षक यांचे नेतृत्वाखाली गुन्हेगार वॉच पेट्रोलींग फिरत असताना नालासोपारा पुर्व प्रगतीनगर, ९० फुट रोडवरील साई अपार्टमेन्ट जवळ येथे आरोपीत ईसम नामे इग्नाटीअस ओकोनक्वो वय ४९ वर्षे, रा. साई अपार्ठमेन्ट, रु नं. १०८, ९० फुट रोड, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व मुळ रा. लेगस स्टेट, देश नायजेरीया यास पोलीस आल्याची चाहूल लागताच पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याचेबाबत संशय बळावुन पोलीस पथकाने नमुद आरोपीत नायझेरीन नागरीकास गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या ईसमांच्या घेतलेल्या अंगझडती दरम्यान सदर ईसमाच्या ताब्यात २० ग्रॅम वजनाचे २,४०,०००/- रु किंमतीचा एम डी नावाचा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याचे ताब्यातील एम.डी (M.D) अंमली पदार्थाचा दोन पंचांचे समक्ष सविस्तर पंचनामा करुन नमुद आरोपीत ईसमांस मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीविरुध्द सहा फौजदार रमेश अधीकराव भोसले नेम- गुन्हे शाखा कक्ष- २ वसई, मि.भा- व.वि. पोलीस आयुक्ताल यांनी सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद दिली असुन त्याबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं ७०२/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क),२१ (ब)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, म.सु.ब.अविनाश चौधरी, रामेश्वर केकान यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.

**----0000----**